# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३**

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

## कपात सूचनांची एकुण संख्या - ६४

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडडी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०५, कला व संस्कृती**<br>**रूपये:- १२,३३,१६,३३,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१) | ५९११ | १० | मलकापुर विधानसभा मतदार संघातील मलकापुर आणि नांदुरा या दोन्ही तालुक्यातील कलाकारांच्या कलगुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने दोन्ही तालुक्यातील शहराच्या ठिकाणी कला व संस्कृतीच्या प्रचालणासाठी शासकीय प्रेक्षागृहे आणि सभागृहे बांधकाम करण्याची स्थानिक कलाकारांकडून सातत्याने मागणी असणे, दोन्ही तालुक्यातील कलाकारांसाठी शासनाच्या कोणत्याही भौतिक सुविधा उपलब्ध नसणे , त्या अनुषंगहाणे दोन्ही तालुक्यातील शहराच्या ठिकाणी शासकीय प्रेक्षागृहे आणि सभागृहे बांधकाम करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल केदार** |
| (२) | ५७५२ | १० | नागपूर जिल्हयातील कळमेश्वर या तालुक्यात तसेच लगतच्या तालुक्यात अनेक नाटय कलाकर, नाटय प्रेमी, असणे, वर्षातून किमान चार महिने कळमेश्वर शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी या कार्यक्रमाचे वविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन होत असून मोठया प्रमाणात नाटय प्रेमी उपस्थित राहणे, परंतू या चांगल्या कार्यक्रमासाठी तालुक्यात कुठेही व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे नसल्याने तालुका कळमेश्वर शहरासह तालुक्यात सर्व साईने युक्त व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे अत्यंत आवश्यकता असणे, नाटयगृहाची मागणी नाटय कलाकारासह नाटय प्रेमी यांनी करणे पंरतू या मागणीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी नागपूर जिल्हयातील कळमेश्वर शहरासह तालुक्यात येथे अत्याधुनिक व सर्व सोईने युक्तव्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे व त्या करीता निधी उपलब्धा करून त्यास प्रशासकीय मान्यता मिळणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ५७५३ | १० | नागपूर जिल्हयातील सावनेर या तालुक्यात तसेच लगतच्या तालुक्यात अनेक नाटय कलाकर, नाटय प्रेमी, असणे, वर्षातून किमान चार महिने सावनेर शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी या कार्यक्रमाचे वविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन होत असून मोठया प्रमाणात नाटय प्रेमी उपस्थित राहणे, परंतू या चांगल्या कार्यक्रमासाठी तालुक्यात कुठेही व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे नसल्याने तालुका सावनेर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शहरासह तालुक्यात सर्व साईने युक्त व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे अत्यंत आवश्यकता असणे, नाटयगृहाची मागणी नाटय कलाकारासह नाटय प्रेमी यांनी करणे परंतू या मागणीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी नागपूर जिल्हयातील सावनेर शहरासह तालुक्यात येथे अत्याधुनिक व सर्व सोईने युक्तव्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे व त्या करीता किमान १५० कोटी रूपयांचे निधी उपलब्धा करून त्यास प्रशासकीय मान्यता मिळणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (४) | ५९१० | १० | तिवसा तालुक्यातील कलाकारांच्या कलगुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने दोन्ही तालुक्यातील शहराच्या ठिकाणी कला व संस्कृतीच्या प्रचालणासाठी शासकीय प्रेक्षागृहे आणि सभागृहे बांधकाम करण्याची स्थानिक कलाकारांकडून सातत्याने मागणी असणे, तिवसा तालुक्यातील कलाकारांसाठी शासनाच्या कोणत्याही भौतिक सुविधा उपलब्ध नसणे , त्या अनुषंगहाणे शहराच्या ठिकाणी शासकीय प्रेक्षागृहे आणि सभागृहे बांधकाम करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत निधी उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (५) | ५७८५ | १० | नाशिक विभाग विकास कार्यक्रम २०१९ अन्वये नाशिक येथे गोरेगाव चित्रनगरीच्या धर्तीवर चित्रपट सृष्टी निर्माण करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली असणे, सदर चित्रपटसृष्टीसाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी मौजे मुंढेगाव, ता.इगतपुरी येथील स.नं.४५९ क्षेत्र ५४.५८ हेक्टर आर तसेच मौजे राजूरबहुला, मौजे विल्होळी ता.नाशिक या जागेबाबत सविस्तर माहितीसह महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास प्रस्ताव सादर केला असणे, या महामंडळाने नवीन चित्रनगरी निर्माण करण्यासाठी व्यवहार्यता व सुसाध्यता तपासण्याकरिता मे.मिटकॉन या संस्थेकडून व्यवहार्यता अहवाल तयार करून घेतलेला असणे, तसेच सदर व्यवहार्यता अहवालाचे विश्लेषण व तपासणी करून हा अहवाल शासनास सादर केलेला असणे, सदर चित्रनगरीसाठी प्रस्तावीत असलेला नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीचा परिसर नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत सुसंपन्न व सुंदर असणे, गोरेगाव चित्रनगरीच्या धर्तीवर नाशिक येथे चित्रनगरी निर्माण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ५७८६ | १० | येवला नगरपरिषद, जि. नाशिक. थोर स्वातंत्र सेनानी श्री.तात्या टोपे यांच्या स्मारकाच्या बांधकामाचे उर्वरित अनुदान उपलब्ध करून देण्याची लोकप्रतिनिधी यांनी दि. ०६ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, येवला नगरपरिषद मालकीच्या स.नं. ४९ व ५० (बाभुळगाव खु.) येथे थोर स्वातंत्र सेनानी श्री.तात्या टोपे स्मारक उभारण्याच्या सुमारे १०.५० कोटी इतक्या रकमेच्या कामाला केंद्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य मंत्रालयाअंतर्गत मंजुरी मिळालेली असणे, त्यापैकी ७५% केंद्र हिस्सा रक्कम रुपये ७.८८ कोटी १५% राज्य हिस्सा रक्कम रु. १.५७ कोटी. १०% स्व हिस्सा १.०५ कोटी या प्रमाणे निधी उपलब्ध होणार असणे, रक्कम रुपये ३.९४ कोटी इतका निधी केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेला असणे, सदर स्मारकाचे काम |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रगतीपथावर असून उपलब्ध निधीपैकी रक्कम रु.३.९२ कोटी इतकी रक्कम आज पावेतो खर्च झालेली असणे, हा प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने उर्वरित निधी तातडीने मिळणे गरजेचे असणे, केंद्र शासनाकडे प्रलंबीत असलेली रक्कम रु.३.९४ कोटी मिळण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे मागणी करण्याची त्याचप्रमाणे राज्य हिश्यातील उर्वरीत रक्कम रु.१.५७ कोटी निधी लवकरात लवकर राज्य शासनाने वितरीत करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (७) | ५७४४ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून प्रसिध्द असून या ब्रम्हपूरी तालुक्यात तसेच लगतच्या तालुक्यात अनेक नाटय कलाकर, नाटय प्रेमी, असणे, वर्षातून किमान चार महिने ब्रम्हपुरी शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी नाटक तसेच दंडार या कार्यक्रमाचे आयोजन होत असून मोठया प्रमाणात नाटय प्रेमी उपस्थित राहणे, परंतू या चांगल्या कार्यक्रमासाठी तालुक्यात कुठेही व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे नसल्याने तालुका ब्रम्हपूरी शहरासह तालुक्यात सर्व साईने युक्त व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे अत्यंत आवश्यकता असणे, नाटयगृहाची मागणी नाटय कलाकारासह नाटय प्रेमी यांनी करणे परंतू या मागणीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी शहरासह तालुक्यात येथे अत्याधुनिक व सर्व सोईने युक्तव्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे व त्या करीता निधी उपलब्धा करून त्यास प्रशासकीय मान्यता मिळणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (८) | ५७४५ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही या तालुक्यात तसेच लगतच्या तालुक्यात अनेक नाटय कलाकर, नाटय प्रेमी, असणे, वर्षातून किमान चार महिने सिंदेवाही शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी नाटक तसेच दंडार या कार्यक्रमाचे आयोजन होत असून मोठया प्रमाणात नाटय प्रेमी उपस्थित राहणे, परंतू या चांगल्या कार्यक्रमासाठी तालुक्यात कुठेही व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे नसल्याने तालुका सिंदेवाही शहरासह तालुक्यात सर्व साईने युक्त व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे अत्यंत आवश्यकता असणे, नाटयगृहाची मागणी नाटय कलाकारासह नाटय प्रेमी यांनी करणे परंतू या मागणीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही शहरासह तालुक्यात येथे अत्याधुनिक व सर्व सोईने युक्तव्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे व त्या करीता किमान १५० कोटी रूपयांचे निधी उपलब्धा करून त्यास प्रशासकीय मान्यता मिळणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (९) | ५७४६ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली या तालुक्यात तसेच लगतच्या तालुक्यात अनेक नाटय कलाकर, नाटय प्रेमी, असणे, वर्षातून किमान चार महिने सावली शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी नाटक तसेच दंडार या कार्यक्रमाचे आयोजन होत असून मोठया प्रमाणात नाटय प्रेमी उपस्थित राहणे, परंतू या चांगल्या कार्यक्रमासाठी तालुक्यात कुठेही |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे नसल्याने तालुका सिंदेवाही शहरासह तालुक्यात सर्व साईने युक्त व्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे अत्यंत आवश्यकता असणे, नाटयगृहाची मागणी नाटय कलाकारासह नाटय प्रेमी यांनी करणे पंरतू या मागणीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सावली शहरासह तालुक्यात येथे अत्याधुनिक व सर्व सोईने युक्तव्यासपीठ/नाटयगृह/शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे बांधकाम करणे व त्या करीता निधी उपलब्धा करून त्यास प्रशासकीय मान्यता मिळणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (१०) | ५८२९ | १० | दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी या दोन्ही तालुक्यातील कलाकारांच्या कलगुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने दोन्ही तालुक्यातील शहराच्या ठिकाणी कला व संस्कृतीच्या प्रचालणासाठी शासकीय प्रेक्षागृहे आणि सभागृहे बांधकाम करण्याची स्थानिक कलाकारांकडून सातत्याने मागणी असणे, दोन्ही तालुक्यातील कलाकारांसाठी शासनाच्या कोणत्याही भाउटीक सुविधा उपलब्ध नसणे , त्या अनुषंगहाणे दोन्ही तालुक्यातील शहराच्या ठिकाणी शासकीय प्रेक्षागृहे आणि सभागृहे बांधकाम करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ५८३८ | १० | महाराष्ट्र राज्य हा विविध संस्कृतीने नटलेला भारताचा अविभाज्य घटक असणे , राज्यातील प्रत्येक विभागात , जिल्ह्यात , तालुक्यात वेगवेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडत असणे , परंतु वेगाने होत असलेल्या जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील संस्कृती लुप्त होत असणे , येणाऱ्या पिढीला आपली संस्कृती ची माहीती ज्ञात व्हावी तसेच भविष्यात त्यांनी आपल्या संस्कृतीचे जतन संवर्धन कर यावे यांकरीता शासनाच्या माध्यमातून तालुका स्तरावर राज्य कला संस्कृति जतन, संवर्धनासाठी विविध कला महोत्सवाचे आयोजन करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५८४० | १० | दर्यापूर मतदारसंघातील महिमापूर ता. दर्यापूर येथील पुरातन काळातील स्थापत्यकलेचा अजोड व अनोखा नमूना असलेली एतीहासिक सातमजली पायरीविहीर मुघलकालीन असणे , या विहिराला पाहत असताना राजवाडा पाहल्याचा भास होत असून या विहिरीला १२ दरवाजे असून विहीरीचे कोरीव काम अद्भुत असणे , या वैशिष्ट्यपूर्ण विहीरीचे जतन व संवर्धन करण्याची प्राचीन जाणकार व पर्यावरण प्रेमींची नितांत मागणी असणे , जिल्हा वार्षिक योजना मधून येथील जतन संवर्धन तसेच पर्यटकांना मूलभूत सुविधा निर्मा होण्यासाठी अत्यल्प निधी प्राप्त होत असणे , सदर वैशिष्ट्यपूर्ण विहीरीचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत विकास आराखडा तयार करून निधी उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडडी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५२, पर्यटन**<br>**रूपये:- १७,८६,००,४१,०००/-** |
| | | | **श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे** |
| (१३) | ५३८९ | १०० | पुणे जिल्हयातील खेड तालुक्यातील निमगांव ग्रामपंचायतमध्ये श्रीक्षेत्र खंडोबाचे देवस्थान असून या देवस्थानाला पुणे जिल्हयासह अन्य जिल्हयातील भाविक दर्शनाकरिता येत असल्याने या ग्रामपंचायतीतील नदीलगत कॉक्रिट संरक्षण भिंत बांधणे, अण्णा वस्ती रस्ता डांबरीकरण करणे ही कामे होणे गरजेचे असल्याने स्थानिकांनी संबधित प्रशासनाकडे वारंवार मागणी करुनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. राजेश एकडे** |
| (१४) | ५८९६ | १० | श्री क्षेत्र जंगली महाराज संस्थान, नांदुरा जि.बुलडाणा च्या विकासासाठी सतत मागणी होत असणे, त्या अनुषंगाने प्रादेशिक पर्यटन विकास योजना 2021-2022 अंतर्गत मलकापूर विधानसभा मतदारसंघातील श्री क्षेत्र जंगली महाराज संस्थान, नांदुरा जि.बुलडाणा या पर्यटन क्षेत्राच्या परिसर सुशोभीकरणासाठी निधी मंजुर करण्यात आला होता. परंतु काही कारणास्त कामांना स्थगिती देण्यात आली असणे, गावातील विकासाकरीता सदरहू कामावरील स्थगिती उठविण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. लहू कानडे** |
| (१५) | ५८३५ | १० | अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील सरला बेट येथील पर्यटन विकासासाठी कामांना स्थगिती दिल्यामुळे सदरची कामे पूर्ण न होणे, सरला बेट हे तीर्थक्षेत्र औरंगाबाद, नाशिक ,अहमदनगर अशा अनेक जिल्ह्यातील जनतेचे मोठे श्रद्धास्थान असून दरवर्षी या ठिकाणी वीस लाखापेक्षा अधिक भाविक येत असतात ,या तीर्थ क्षेत्राचा विकास होणे अत्यावश्यक असून त्या विकास कामासाठी लावण्यात आलेली स्थगिती तातडीने उठविण्यात यावी व सरला बेट या तीर्थक्षेत्राच्या विकास कामांना निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल केदार** |
| (१६) | ५७४९ | १० | नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तालुक्यातील तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध होत नसल्याने तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होणे, त्यामुळे भाविकांना याचा माणसिक व आर्थीक त्रास सहण करावा लागणे, भाविकांनी तीर्थक्षत्राच्या विकासासाठी निधीची मागणी करून सुध्दा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे भाविकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी नागपूर जिल्हयातील कळमेश्वर या तालुक्यातील तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे तसेच तेथील विकासकामांना प्रशासकीय मान्यता देणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१७) | ५७५१ | १० | नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध होत नसल्याने तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होणे, त्यामुळे भाविकांना याचा माणसिक व आर्थीक त्रास सहण करावा लागणे, भाविकांनी तीर्थक्षत्राच्या विकासासाठी निधीची मागणी करून सुध्दा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे भाविकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी नागपूर जिल्हयातील सावनेर या तालुक्यातील तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे तसेच तेथील विकासकामांना प्रशासकीय मान्यता देणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (१८) | ५८५१ | १० | मौजे-जांभुळवाडी येथील “शिवकालीन तलाव “ चे सुशोभिकरण करण्यासाठी निधीची तरतूद होणेबाबत. पुरंदर-हवेली विधानसभा मतदार संघातील हवेली तालुक्यातील मौजे - जांभुळवाडी येथे ऐतिहासिक वारसा असलेला “शिवकालीन तलाव” असून साधारण ३०० एकर क्षेत्रामध्ये पसरलेला आहे. ‘“जांभुळवाडी तलाव” छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संकल्पनेतून तलावाची निर्मिती झालेली आहे. सद्यस्थिती मध्ये आंबेगाव - जांभुळवाडी या गावांमध्ये वाढत्या शहरीकरणामुळे या तलावाचे नैसर्गिक सौदर्य हरवल्यासारखे वाटू लागले आहे. तेथील स्थानिक शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर तलावा लगत असलेल्या जागेवर घनकचरा टाकला जातो त्यामुळे तलावातील पाणी दुषित होऊन सगळीकडे दुर्गंधी पसरते. त्यामुळे सदर तलावाच्या लगत असलेला जागेवर जॉगिंग ट्रक, तलावास संरक्षण भिंतीचे बांधकाम, बोटिंग तसेच इतर सुशोभिकरण केल्यास पर्यटनास चांगला वाव मिळेल त्याकरीता सदर सुशोभिकरण करण्यासाठी अंदाजित १०.०० कोटी रूपयांची तरतूद करून निधी उपलब्ध करून द्यावा. |
| (१९) | ५८५२ | १० | छ. संभाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या किल्ले पुरंदर येथे भव्य पुर्णाकृती पुतळा, शंभुसृष्टी तसेच गड किल्ल्यांचे जतन, संवर्धन, पावित्र्य जपण्यासाठी निधीची तरतूद करणेबाबत. पुरंदर तालुक्यात धर्मवीर छत्रपत्री संभाजी महाराजांचे जन्मस्थान म्हणजेच किल्ले पुरंदर याच पुरंदर किल्ल्याच्या नावावरूनच तालुका ओळखला जातो. पुरंदर किल्ला हा सह्याद्रीच्या उंच पर्वत रांगेवर असून समुद्रसपाटी पासून १५०० मीटर उंचीवर असून किल्ल्यावर मोठ्या प्रमाणावर दुर्लभ औषधी वनस्पतीचे जतन, संवर्धन व पावित्र्य जपणे आवश्यक आहे. किल्ल्यावर संभाजी महाराजांचा लहानसा पुतळा असून याठिकाणी भारतीय लष्कराचे नव्याने युध्द सामुग्रीची कोठारे त्याचप्रमाणे इतर देखभाल दुरूस्तीची कामे केल्याने किल्ल्यावर वावरण्यावर निर्बंध आलेले आहेत. त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. परंतु महाराष्ट्रातील अनेक शिवप्रेमींच्या भावना त्याचप्रमाणे आपल्या दैदिप्यमान इतिहासाची साक्ष देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीची साक्ष देणाऱ्या या ऐतिहासिक वस्तुवर छ. संभाजी महाराजांचा भव्य पुर्णाकृती पुतळा व शंभुसृष्टी निर्माण करण्यासाठी आपल्या विभागाची परवानगी व निधीची तरतूद करावी. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२०) | ५८५३ | १० | सृष्टीनिर्माता ब्रह्मदेवाच्या तपश्चर्येने पावन झालेल्या ब्रम्हपुरी म्हणजेच सध्याच्या पुरंदर तालुक्यातील कऱ्हा नदीच्या उगमापासून सिध्देश्वर, वटेश्वर, संगमेश्वर, केदारेश्वर, नारायणेश्वर, पांडेश्वर अशी लहान-मोठी महादेवाची पांडवकालीन मंदिरे आहेत. संत ज्ञानेश्वरांचे धाकटे बंधू संत सोपानदेवांची समाधी याच कऱ्हाकाठीवर सासवड (पुरंदर) येथे असून यावर्षी ७२५ वा समाधी सोहळा संपन्न झालेला आहे. छत्रपत्री संभाजी महाराजांचे जन्मस्थान म्हणजेच किल्ले पुरंदर याच पुरंदर किल्ल्याच्या नावावरूनच तालुका ओळखला जातो. त्याचप्रमाणे अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत श्रीक्षेत्र जेजुरीचा खंडेरायाच्या गडाचा ३४९ कोटींचा विकास आराखडा मागील अर्थसंकल्पात मंजूर झालेला आहे. सह्याद्री पर्वतावर यादवकालीन शिल्पकलेचा सुंदर नमुना असलेले भुलेश्वर मंदिर याच तालुक्याच्या पुर्वेला आहे. शंभु महादेवाची सिध्देश्वर, चांगवटेश्वर, संगमेश्वर, जवळार्जुन, पांडेश्वर ही पांडवकालीन मंदिरे आपल्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देत दिमाखात उभी आहेत. स्वराज्याची पहिली लढाई झालेला व पुरंदरचा तह या ऐतिहासिक पुरंदर तालुक्यात आद्य क्रांतीवीर राजेउमाजी नाईक यांचे जन्मगाव भिवडी, होनाजी बाळा, सगनभाऊ, बाबुराव जगताप, वीरबाजी पासलकर यांची समाधी, सरसेनापती सिदोजीराव थोपटे, सरदार गोदाजी जगताप, पिलाजी जाधवराव, बाळोबा कुंजीर अशी प्रसिध्द इतिहासाला ज्ञात असलेली थोर पुरूष जन्माला आली. तसेच महात्मा फुले यांचे मूळगाव खानवडी हे पुरंदर मध्येच आहे. सासवडचा अंबाजी पुरंदरे, बाळोबा कुंजीर व इतर सरदारांचे वाडे आजही लक्ष वेधून घेतात. नजिक असलेला सरदार पानसे यांचा किल्ले मल्हारगड (सोनोरी) येथेच आहे. कऱ्हेपठारला साहित्यिकांचा वारसा प्राचीन काळापासून आहे. रामायणकार वाल्मिक ऋषि यांचे समाधीस्थळ वाल्हे येथे असून या स्थळाजवळच ७ ऐतिहासिक रांजण आहेत. संत सोपानदेव, शंभर चौरस मैलाच्या पुरंदरदास, श्रीधरपंत नाझरेकर, शाहिर सगनभाऊ, होनाजी बाळा, महात्मा ज्योतीराव फुले, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचे मुळगाव सासवड, साहित्य मार्तंड यशवंतराव सावंत यांच्या पासून ते अलिकडच्या पिढीतील प्रसिद्ध साहित्यिक पत्रकार साहित्य लेखनीची मोठा परंपरा आहे.ऐतिहासिक, धार्मिक वारसा असलेले श्रीनाथ म्हस्कोबा देवस्थान वीर, कोडीत तसेच बोपगाव येथील कानिफनाथ मंदिर, समुद्र सपाटीपासून सर्वांत उंच असलेल्या पुरंदर किल्ल्यालगत असलेले श्रीक्षेत्र नारायणपूर येथील एकमुखी श्री दत्त मंदिर, नव्याने निर्माण केलेले प्रति बालाजी मंदिर आहे. मौजे - जेजुरी येथे अहिल्याबाई होळकर तलाव, पेशवे तलाव व मौजे वडकी येथील “मस्तानी तलाव”, सासवड येथील “मस्तानी महाल” हे उत्कृष्ट वास्तु कलेचे नमुने पाहण्यासाठी देश-विदेशातून हजारो पर्यटक, भाविक दर्शनासाठी, कुलधर्म, कुलाचार, पर्यटनासाठी दररोज येत असतात. त्याचप्रमाणे पुरंदर तालुक्यातील रस्ते हे अनेक राष्ट्रीय महामार्गांना जोडणारे मार्ग असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुक वर्दळ असते. या सर्व बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करून पुरंदर तालुका पर्यटन स्थळ घोषित केल्यास तरूणांना रोजगार उपलब्ध होण्याबरोबरच या ऐतिहासिक, धार्मिक, पर्यटन स्थळांचे जतन होवून पर्यटन वाढीसाठी चालना मिळेल यासाठी पुरंदर-हवेली तालुका विशेष पर्यटन क्षेत्र घोषित करावे. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२१) | ५८९८ | १० | केकतपूर, शेवती जहाँगीर हे दोन्ही पर्यटन व तिर्थस्थळे अमरावती तालुक्यातील ग्रामीण भागातील असून यापैकी केकतपूर व शेवती जहाँगीर येथे नैसर्गीकरित्या तलाव असून विविध प्रकारच्या पक्षांचे विदेशातून आगमन असणे, ते बघण्याकरीता राज्यातील पर्यटक बघण्याकरिता येतात. करीता येथे येणाऱ्या पर्यटकांना राहणे व इतर सुविधा मिळाव्या तसेच स्थानिक लोकांना रोजगार मिळावा याअनुषंगाने या पर्यटन स्थळाचा विकास होण्याकरिता प्रत्येक 10 कोटी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ५८९९ | १० | संगमेश्वर हे अमरावती-नागपूर हायवेवर असून नांदगांव पेठ येथून 2 कि.मी. अंतरावर आहे. येथे शंकराची पौराणिक मुर्ती असून दरवर्षी विविध यात्रांना लाखोच्या संख्येने भाविक कार्यक्रमाला व दर्शनाला येत असणे, भाविकांची संख्या लक्षात घेता येथे निर्माण झालेल्या मुलभूत सुविधा अत्यंत अपुऱ्या पडत असून सोयी-सुविधांमध्ये वाढ होण्याकरिता निधीची अत्यंत आवश्यकता असून याकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ५९०१ | १० | जहाँगीरपूर, ता. तिवसा येथील श्री महारुद्र हनुमानाचे अतिप्राचिन मंदिरअसून येथे दरवर्षी होणाऱ्या नियमित विविध कार्यक्रमांना विदेशातून तसेच विविध राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनाला येत असणे, परंतु येथे येणाऱ्या देश-विदेशातील भाविकांची संख्या लक्षातघेता मुलभूत सुविधा अत्यंत अपुऱ्या पडत असणे, सदहू तिर्थस्थळाला ‘ब’ दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असून अद्यापही मंजुरी मिळालेली नसणे, ‘ब’ वर्ग दर्जास मंजुरी मिळाल्यास भाविकाच्या दृष्टीने मुलभूत सुविधा उपलब्ध होणे, याअनुषंगाने ‘ब’ वर्ग दर्जा मान्यता तसेच निधी मंजुरीबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ५९०२ | १० | तिवसा, (जि. अमरावती) ता. तिवसा येथील वनजमिनीवर पर्यटन केंद्र निर्माण करण्याकरिता सातरगांव रोडवरील वनविभागाची 20 एकर जागा वनविभाग पर्यटनाकरिता आरक्षित असणे संरक्षण भिंतीचे काम पुर्ण झालेले असणे सदहू जागा ही नागपुर-अमरावती हायवेवर असणे तिवसा शहराची लोकसंख्या लक्षात घेता अमरावती जिल्ह्यात चिखलदरा, धारणी नंतर अमरावती जिल्ह्यात एक मोठे पर्यटन केंद्र विकसित होवून पर्यटनास वाव मिळू शकणे, स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी या 20 एकर क्षेत्रामध्ये वन पर्यटन क्षेत्र विकास होण्याकरिता आवश्यक निधी योग्य ते नियोजन करुन मंजुरीबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (२५) | ५८७१ | १० | तांदुळवाडी ता.लातूर येथे विठ्ठल-रूक्मिणी मंदिर परिसरात सांस्कृतीक सभामंडप बांधणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२६) | ५८७२ | १० | धनेगाव ता.लातूर येथे रोकडेश्वर मंदिर परिसरात सांस्कृतीक सभामंडप बांधणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ५८७४ | १० | सेलू बु. ता.लातूर येथे श्रीकृष्ण मंदिर परिसरात सुधारणा करणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ५८७५ | १० | पानगाव ता.रेणापूर येथे विठ्ठल-रूक्मिणी मंदिर परिसर सुधारणा करणे व संरक्षण भिंत बांधणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | ५८७७ | १० | माणूसमारवाडी ता.रेणापूर येथे श्रीक्षेत्र बालाजी देवस्थान समोर सभामंडप व स्वच्छता गृह बांधणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (३०) | ५८२० | १० | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे सिंहगडावरील पर्यटक निवास कोट्यावधी रुपये खर्च करून सुद्धा वापराविना पडून असल्याचे निदर्शनास आले असणे, सदरहू पर्यटक निवास ३२ गुंठे जागेवर बांधण्यात आले असणे, त्याच्या दुरुस्तीच्या कामास लाखो रुपयांचा निधी खर्च झाला असणे,तसेच उक्त पर्यटक निवासाचे उदघाटन होऊनही ते सुरु करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले असणे, सदरहू महामंडळाचे सिंहगडावरील विकासकामासाठी दुर्लक्ष होत असणे, तसेच भगवा ध्वज सह इतर कामांसाठी वारंवार पाठपुरावा करून देखील जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (३१) | ५८२१ | १० | राज्य शासनाने अष्टविनायक परिक्रमा, अष्टविनायक आराखडा तयार केला असून सिध्दटेक हे या आरखडयातील एक पर्यटन स्थळ असणे, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात सदर आराखडयासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत घोषणा करण्यात आली असणे, सिध्दटेक परिसराचा विकास करुन तेथे बोटिंग क्लब व साहसी खेळ सुरु करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव पर्यटन विभागाकडे सादर केला असून त्यास पर्यटन संचालक यांची ना हरकत देखील प्राप्त झाली असताना त्यावर तसेच अश्त्विन्यक सर्किट विकास आराखड्याच्या कामांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, सिध्दटेक परिसराचा विकास करण्यासाठी तसेच अष्टविनायक सर्किट विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता. |
| (३२) | ५८२३ | १० | पुरंदर व हवेली (जि.पुणे) या तालुक्यांमध्ये अनेक धार्मिक ठिकाणे असून त्यामध्ये श्री संत सोपान देव महाराज समाधी, भैरवनाथ मंदिर, महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबा यांचा जेजुरी गड व अनेक निसर्गमय घाटमाथे, पुरंदर किल्ला, संभाजी महाराजांचे जन्मस्थान इत्यादी ठिकाणी देश-विदेशातून पर्यटक येत असणे, सदरहू दोन्ही तालुक्यांना मोठा इतिहास असून येथे येणाऱ्या भाविकांना व पर्यटकांना योग्य प्रमाणात मूलभूत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सोयी- सुविधा उपलब्ध नसणे, पुरंदर व हवेली तालुक्यातील धार्मिक क्षेत्रात पर्यटन म्हणून चालना देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (३३) | ५८२४ | १० | रायगड पर्यटनदृष्ट्या महत्वपूर्ण जिल्हा असून पर्यटनाला आणखी चालना मिळावी यासाठी तत्कालीन शासनाने पर्यटन विभागाच्या माध्यमातून रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर या जिल्ह्यांत गोव्याच्या धर्तीवर समुद्र कुटी संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला असणे, त्यानुसार अलिबाग तालुक्यातील वरसोली तर श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर समुद्रकिनारी प्रकल्प तयार करण्यास शासनाने मंजूरी दिली असणे, हा प्रकल्प झाल्यास पर्यटनास चालना मिळून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार असणे, यामुळे वरसोली ग्रामपंचायत व दिवेआगर ग्रामपंचायतीने गावाच्या विकासाच्या दृष्टीने प्रकल्पाला सर्वतोपरी मदत करीत एमटीडीसीला जागा उपलब्ध करुन दिली असणे, त्यासाठी कन्सल्टंट नेमण्यात आलेले असताना अद्याप प्रकल्पाची एकही वीट रचली गेलेली नसल्याचे उघडकीस येणे, तसेच सदर समुद्र कुटी प्रकल्प हा समुद्रकिनारी होणार असल्याने त्याला पर्यावरण विभागाची मंजुरीही तसेच काही ठिकाणी वन विभागही असल्याने त्यांचीही परवानगी आवश्यक असतांना या विभागांकडून अद्याप परवानग्या प्राप्त करून घेण्यास शासनास आलेले अपयश,परिणामी प्रलंबित प्रकल्पामुळे स्थानिक बेरोजगार तरुणांच्या मनात शास्नाविषयी पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (३४) | ५८२५ | १० | राज्यात सुमारे ४०० गड किल्ले असून त्यापैकी ४८ किल्ले हे राज्य पुरातत्व खात्याच्या संरक्षणात तर ४७ किल्ले केंद्र पुरातत्व खात्याच्या संरक्षणात असणे, उर्वरित तब्बल ३०० हून अधिक किल्ले हे आजही असंरक्षित असणे, अनेक किल्ल्यांची मोठ्या प्रमाणात पडझड होत असून विशेषत: सिंहगड (जि.पुणे), मंगळवेढा भुईकोट किल्ला (जि.सोलापूर), किल्ले अवचितगड (जि.रायगड), सायन किल्ला (मुंबई) यासह सर्वच गड किल्ल्यांचे संवर्धन करण्याची मागणी गडप्रेमी करीत असताना त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, सन 2022-23 मध्ये शासनाने 52.82 कोटी तरतूद केलेली असताना केवळ 9.90 कोटी रुपये खर्च केला असणे, राज्यातील गड किल्ल्यांच्या विकासासंदर्भात माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मंत्रालयात झालेल्या बैठकीनुसार घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, राज्यातील सर्व गड किल्ल्यांसंदर्भात विकास आराखडा तयार करुन त्याची दुरुस्ती, नुतनीकरण, सुशोभीकरण तसेच त्यासाठी आवश्यक निधीबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तसेच राज्यातील दुर्ग संवर्धनासाठी दुर्ग प्राधिकरणाची निर्मिती करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (३५) | ५८२६ | १० | मौजे रुई तलाव, तालुका दिग्रस (जि.यवतमाळ) या ठिकाणी देशातील प्रमुख बंजारा समाजाचे आराध्य दैवत परमपूज्य संत सेवालाल महाराज यांचे मंदिर असून येथे देश-विदेशातून बंजारा समाजातील भाविक येत असणे, संत सेवालाल महाराजांच्या वास्तव्याने सदरहू रुई तलाव या गावातील परिसराला वेगळेच अध्यात्मिक महत्व असल्याने येथे येणाऱ्या भाविकांना व पर्यटकांना योग्य प्रमाणात मूलभूत सोयी- सुविधा ग्रामपंचायत इसापूर ते संत सेवालाल महाराज मंदिरापर्यंत रस्तेचे काम, पिण्याचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पाणी,वीज, दिवाबत्ती इत्यादी सोई सुविधा उपलब्ध नसणे, दिग्रस तालुक्यातील धार्मिक क्षेत्रात पर्यटन म्हणून चालना देण्यासाठी या कामना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (३६) | ५८८२ | १० | जळगाव जिल्ह्यातील अमळनेर मतदार संघातील प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन 2021 22 अंतर्गत श्री बद्रीनाथ मंदिर संस्थान बहादरपूर येथील विकास कामे करणे या कामास निधी मंजूर असणे परंतु शासनाने परिपत्रक काढून सदर मंजूर कामास्तगीते देणे सदर स्थगिती उठवून निधी वितरित करणे बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३७) | ५८६६ | १०० | जळगाव जिल्ह्यातील कोथळी तालुका मुक्ताईनगर येथील संत मुक्ताई मंदिर परिसरातील पर्यटन विभागाकडून मंजूर असलेले अम्युजमेंट पार्क काम निधी अभावी बंद असल्याने बांधकाम सदर अमेझॉन पार्कच्या पूर्णत्वासाठी तत्काळ निधी उपलब्ध देण्यायाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ५८८१ | १०० | प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत अमळनेर जिल्हा जळगाव मतदार संघातील श्री मंगळ ग्रह महाराज देवस्थान, श्री संत महाराज समाधी स्थळ आणि विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर व अंबऋषी महाराज देवस्थान विकाससाठी निधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला असणे, सदर प्रस्तावास उच्च स्तरीय समितीची मेनीत मिळालेली असणे, परंतु शिखर समितीच्या अंतिम मान्यते साठी प्रस्ताव प्रलंबित असणे, शिखर समितीची बैठक गेल्या वर्षांत झालेली नसणे, सदर कामास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देणे बाबत शासनाने करावे याची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (३९) | ५७९० | १० | नायगाव ता.खंडाळा जि.सातारा येथील पर्यटन निवास महाज्योतीला चालविणेसाठी लोकप्रतिनिधी यांनी दि. ०४ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, नायगाव ता.खंडाळा जि.सातारा येथे पर्यटन विभागाचे संकुल बांधलेले असणे, मात्र सदर संकुल वापरात नसल्यामुळे मागील ५ वर्षांपासून बंद पडलेले असणे, या संकुलाची दुर्दशा झाल्यामुळे त्यासाठी पुन्हा देखभाल दुरुस्तीची मोठ्या प्रमाणावर गरज असणे, महाज्योतीला जर हे पर्यटन संकुल हस्तांतरित केले तर महाज्योती या पर्यटन संकुलाची पूर्ण देखभाल दुरुस्ती करून त्याचा उपयोग पर्यटकांसाठी करू शकणार असणे, नायगाव ता.खंडाळा जि.सातारा येथील बंद असलेले पर्यटन संकुल महाज्योती या संस्थेला वापरण्यासाठी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४०) | ५७९३ | १० | प्रादेशिक पर्यटन विकास योजना अंतर्गत दि. ३१ मार्च २०२२ च्या शासन निर्णयाअन्वये मंजुर असलेले श्री. रेणुका माता मंदिर निमगाव वाकडा ता.निफाड जि.नाशिक येथील रु. २९५ लक्षचे विकासकामांना स्थगिती दिलेली असणे, स्थगिती उठवून ही कामे सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २८ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, शासनाने या कामावरील स्थगिती उठविण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४१) | ५७९५ | १० | मौजे अंजनेरी ता.त्र्यंबकेश्वर येथील गट नं. ५९२ अ पैकी क्षेत्र ४.३२ हेक्टर आर या जागेवर पर्यटकांसाठी ट्रेकिंग इन्स्टिट्यूट पुर्ण झालेले असणे, सदर इन्स्टिट्यूट सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ताब्यात घेवून शिल्लक असलेल्या अनुदानातून रु. १३२.२५ लक्ष मधून क्लाईबिंग वॉल, डॉर्मिटरी व मेसमधील संपूर्ण फर्निचर, आवश्यक असलेले क्रीडा साहीत्य व पार्किंग या बाबींचे बांधकाम करून घेण्याची आवश्यकता असणे, सदर ट्रेकिंग इन्स्टिट्यूट सुरु करण्याची आवश्यकता असणे, गिर्यारोहक व पर्यटकांसाठी ही संस्था सुरु करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (४२) | ५८८९ | १०० | प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत बीड तालुक्यातील कपिळधार हे लिंगायत धर्मगुरू श्री मन्मथस्वामी यांचे समाधी स्थळ असणे, याठिकाणी बालाघाटच्या डोंगर रांगांमध्ये नैसर्गिक धबधबे असणे, यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक व पर्यटक आकर्षित होत असणे, या ठिकाणच्या सर्वांगीण विकास व सुशोभीकरण करण्यासाठी निधीचा आराखडा मंजूर असणे, सदर आराखड्यातील रक्कम मंजूर करून सदर विकासकामे सुरू करण्याबाबत होत असलेली मागणी, त्यावर करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (४३) | ५८९० | १०० | प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील मौजे लोणी (वारणी) ता.शिरूर कासार येथील खंडोजी बाबा देवस्थान क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सन 2022 मध्ये 4 कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला असणे, सदर कामाची प्रशासकीय मान्यता झालेली असताना निविदा स्तरावर असताना शासनाने या कामास स्थगिती दिलेली असणे, संत खंडोजी बाबा यांच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांची व स्थानिक नागरिकांच्या भावना विचारात घेत सदर स्थगिती रद्द करून पूर्ववत काम सुरू ठेवण्याबाबत होत असलेली मागणी, त्यावर करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (४४) | ५८९१ | १०० | प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील धारूर येथील ऐतिहासिक किल्ल्याचे संवर्धन करण्याची नितांत गरज असणे, गड किल्ल्यांचे संवर्धन करून पर्यटक व इतिहास अभ्यासकांना आकर्षित करण्यासाठी या किल्ल्याच्या संवर्धन व विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (४५) | ५८९२ | १०० | प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील धारूर येथील ऐतिहासिक किल्ल्याचे संवर्धन करण्याची नितांत गरज असणे, गड किल्ल्यांचे संवर्धन करून पर्यटक व इतिहास अभ्यासकांना आकर्षित करण्यासाठी या किल्ल्याच्या संवर्धन व विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (४६) | ५८९३ | १०० | प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत बीड शहरातील शहेनशावली दर्गा येथे विकासकामे, सुशोभीकरण व संरक्षक भिंत बांधणीसाठी 10 कोटी रुपये देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केलेली असणे, याबाबतच्या आराखडा तयार करून त्यास मान्यता देण्याबाबत करवायची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (४७) | ५८९४ | १०० | प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत बीड शहरातील पुरातन काळातील व धार्मिक दृष्ट्या महत्व असलेले आकर्षक कंकालेश्वर मंदिराचा विकास व सुशोभीकरण करणे बाबत सातत्याने होत असलेली मागणी, याचा आराखडा तयार करून त्यास निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (४८) | ५७३८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यातील इंग्रजकालीन ११७ वर्ष जुना आसोलामेढा तलाव असून निसर्गरम्य असणे, या परिसरास देश व विदेशातील पर्यटक मोठया प्रमाणात भेट देत असणे, परंतू या पर्यटकांच्या दृष्टीने आवश्यकत्या सोईसुविधा नसल्याने पर्यटकांना आर्थीक व मानसिक त्रास सहण करावा लागणे, त्यामुळे आसोला मेढा परिसाराला पर्यटन क्षेत्र घोषीत करून त्यास त्या परिसराच्या विकासासाठी निधीसुध्दा उपलब्ध करून देण्यात येणे, मात्र शासनाने जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून स्थगिती देणे, त्यामुळे यासर्व योजना कागदवरच राहणार असल्याचे मत पर्यटकामध्ये निर्माण होत असल्याने त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यातील आसोला मेंढा परिसरातील पर्यटन स्थळाच्या विकासासाठी मंजूर असलेले कामे पुर्ववत सुरू राहण्यासाठी शासनाने दिलेली स्थगिती ताताडीने उठवून कामे पुर्ववत सूरू राहणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४९) | ५७४० | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध होत नसल्याने तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होणे, त्यामुळे भाविकांना याचा माणसिक व आर्थीक त्रास सहण करावा लागणे, भाविकांनी तीर्थक्षत्राच्या विकासासाठी निधीची मागणी करून सुध्दा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे भाविकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही या तीनही तालुक्यातील तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे तसेच तेथील विकासकामांना प्रशासकीय मान्यता देणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (५०) | ५८४२ | १० | दर्यापूर मतदारसंघात शहानुर हा जलसंपदा विभागाचा ता. अंजनगाव सुर्जी येथे मध्यम व लघु सिंचन प्रकल्प मेळघाटाच्या पायथ्याशी असणे , या लघु सिंचन प्रकल्पाच्या आजूनबाजूने नैसर्गिक सौन्दर्य असणे , तसेच येथे मतदारसंघातील नागरिकांसाठी तसेच या ठिकानी येणाऱ्या निसर्गप्रेमी आणि पर्यटकांसाठी तसेच या भागात रोजगार निर्मितीसाठी पर्यटन केंद्र आणि पर्यटन सुविधा निर्माण होण्याची संदोदित मागणी असणे , परंतु अद्यापही सदर ठिकाणी कोणतीही पर्यटन केंद्र तसेच पर्यटन सुविधा नसणे , यामुळे येथे येणाऱ्या निसर्गप्रेमी तसेच पर्यटकांची निराशा होत असणे , सदर ठिकाणी पर्यटन केंद्र तथा पर्यटन सुविधा निर्माण होण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५१) | ५९०७ | १० | अमरावती जिल्ह्यातील महत्वाच्या पर्यटनस्थळा पैकी मालखडे तलाव येथील कृष्णाजी सागर पर्यटन स्थळ बंद पडले असणे कृष्णाजी सागर पर्यटन स्थळ (मालखेड तलाव) ता चादूर रेल्वे येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असून शालेय सहलि येत असून सद्यस्थितीत हे पर्यटन स्थळ बंद असल्याने प्रमाणात शासनाचा महसूल बुडत असणे , सदर पर्यटनस्थळ हे करार पद्धतीने कंत्राटदाराना चालवण्यास दिले गेले असून मागील करार हा दोन वर्षांचा असतांना कोरोंना काळात सदर पर्यटनस्थळ बंद असल्याने एका वर्षांची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मुदतवाढ देण्याची मागणी संबंधीत कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली असणे , परंतु संबधीत कंत्राटदारांना कोणत्याही प्रकारची मुदतवाढ न देता शासनामार्फत सदर पर्यटन स्थळ बंद केलेले असणे , यामुळे येथील कार्यरत रोजगारांचा रोजंदारीचा प्रश्न निर्माण झालेला असणे , तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांची पर्यटनस्थळ बंद असण्याने नाराजी होत असणे , यामुळे सदर पर्यटनस्थळ सुरु करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५२) | ५७३७ | १० | मुंबई उपनगरातील, मालाड-पश्चिम, आक्सा गावामध्ये आक्सा बीच हा एक नीटनेटका, सुंदर व वालुकामय समुद्रकिनारा असणे, येथील आकर्षक दृश्य पाहण्यासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येणे, आक्सा समुद्रकिनाऱ्यावरची सुंदर दृष्य टिपण्याच्या दृष्टीने आक्सा हा एक छायाचित्रकारांच्या पसंतीचे ठिकाण असणे, मुंबई उपनगरातील महत्त्वाचे स्थळ म्हणून प्रसिद्ध असणे, मात्र नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या या समुद्रकिनारी सुविधांचा अभाव असणे, जीवन सुरक्षा रक्षकांची चौकी नसणे, २४ तास जीवन सुरक्षा रक्षक तैनात करण्याची गरज असणे, प्रसाधनगृहे, बेंचेस, कचरापेट्या आदींबरोबरच विविध सुविधांच्या निर्मिती तसेच पर्यटन विषयक तज्ञांची शासना मार्फत नियुक्ती करुन पर्यटन विकासाचा कृतिआराखडा निर्माण करुन त्या आराखड्याची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५३) | ५७५४ | १० | मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिम, किल्लेश्वर मंदिराच्या बाजूला मढ आयलंड येथील छोट्याशा टेकडीवर मढचा किल्ला वसलेला असणे, वर्सोवा गाव व मढ बेट यांच्यामध्ये असलेल्या खाडीच्या मुखावर इ.स १६०० मध्ये पोर्तूगिजांनी हा किल्ला बांधलेला असणे, हा किल्ला ३ बाजूंनी जमिनीने वेढलेला असून एका बाजूस अरबी समुद्र असणे, अनेक चित्रपटांचे चित्रिकरण ह्या किल्ल्याच्या आत झालेले असणे, पर्यटकांच्या दृष्टीने हा किल्ला आकर्षणाचे केंद्र असणे, मात्र आजच्या तारखेला या किल्ल्याची दुरावस्था झालेली असणे या किल्ल्याची डागडुजी करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५४) | ५७५६ | १० | मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिम येथे एरंगल बीच असणे, एरंगल बीचची जमिन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यात असणे, देश-विदेशातून पर्यटक सदर बीचला भेट देणे, मात्र सदर बीचवर पर्यटन विषयक सोयी-सुविधांचा अभाव असणे, पर्यटकांसाठी सोयी-सुविधांची निर्मिती करण्याची गरज असणे त्यादृष्टीने शासनाने कारावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५५) | ५७५७ | १० | देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरातील दक्षिणेकडील वरळीच्या समुद्रकिनाऱ्यावरील लहानशा बेटावर हाजी अली दर्गा असणे, हाजी अली दर्गा येथे दररोज देशविदेशातील भाविक मोठ्या संख्येने येत असणे,. हे एक महत्त्वाचे धार्मिक तसेच पर्यटनस्थळ असणे, त्यामुळे या परिसराचे नुतनीकरण व सौंदर्यीकरण होणे आवश्यक असणे, त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवाने तातडीने घेण्याची गरज असणे, तसेच सौंदर्यीकरणात बाधा येणारे या परिसरातील अनधिकृत बांधकामे काढून टाकण्याचीही कार्यवाही तातडीने करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५६) | ५७५८ | १० | मुंबई उपनगरातील, मालाड-पश्चिम, मढ गावामध्ये मढ बीच हा एक नीटनेटका, सुंदर व वालुकामय समुद्रकिनारा असणे, येथील आकर्षक दृश्य पाहण्यासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येणे, मढ समुद्रकिनाऱ्यावरची सुंदर दृष्य टिपण्याच्या दृष्टीने मढ हा एक छायाचित्रकारांच्या पसंतीचे ठिकाण असणे, मुंबई उपनगरातील महत्त्वाचे स्थळ म्हणून प्रसिद्ध असणे, मात्र नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या या समुद्रकिनारी सुविधांचा अभाव असणे, जीवन सुरक्षा रक्षकांची चौकी नसणे, २४ तास जीवन सुरक्षा रक्षक तैनात करण्याची गरज असणे, प्रसाधनगृहे, बेंचेस, कचरापेट्या आदींबरोबरच विविध सुविधांच्या निर्मिती तसेच पर्यटन विषयक तज्ञांची शासना मार्फत नियुक्ती करुन पर्यटन विकासाचा कृतिआराखडा निर्माण करुन त्या आराखड्याची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५७) | ५७६० | १० | मुंबई उपनगरातील, मालाड-पश्चिम, मार्वे बीच हा एक नीटनेटका, सुंदर व वालुकामय समुद्रकिनारा असणे, येथील आकर्षक दृश्य पाहण्यासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येणे, मुंबई उपनगरातील महत्त्वाचे स्थळ म्हणून प्रसिद्ध असणे, मात्र नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या या समुद्रकिनारी सुविधांचा अभाव असणे, जीवन सुरक्षा रक्षकांची चौकी नसणे, २४ तास जीवन सुरक्षा रक्षक तैनात करण्याची गरज असणे, प्रसाधनगृहे, बेंचेस, कचरापेट्या आदींबरोबरच विविध सुविधांच्या निर्मिती तसेच पर्यटन विषयक तज्ञांची शासना मार्फत नियुक्ती करुन पर्यटन विकासाचा कृतिआराखडा तयार करुन त्या आराखड्याची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५८) | ५७६१ | १० | मुंबई उपनगरातील, मालाड-पश्चिम, दाना पानी बीच हा एक नीटनेटका, सुंदर व वालुकामय समुद्रकिनारा असणे, येथील आकर्षक दृश्य पाहण्यासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येणे, मुंबई उपनगरातील महत्त्वाचे स्थळ म्हणून प्रसिद्ध असणे, मात्र नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या या समुद्रकिनारी सुविधांचा अभाव असणे, जीवन सुरक्षा रक्षकांची चौकी नसणे, २४ तास जीवन सुरक्षा रक्षक तैनात करण्याची गरज असणे, प्रसाधनगृहे, बेंचेस, कचरापेट्या आदींबरोबरच विविध सुविधांच्या निर्मिती तसेच पर्यटन विषयक तज्ञांची शासना मार्फत नियुक्ती करुन पर्यटन विकासाचा कृतिआराखडा तयार करुन त्या आराखड्याची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५९) | ५७६२ | १० | मुंबई उपनगरातील, गोराई बीच हा एक नीटनेटका, सुंदर व वालुकामय समुद्रकिनारा असणे, येथील आकर्षक दृश्य पाहण्यासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येणे, मुंबई उपनगरातील महत्त्वाचे स्थळ म्हणून प्रसिद्ध असणे, मात्र नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या या समुद्रकिनारी सुविधांचा अभाव असणे, जीवन सुरक्षा रक्षकांची चौकी नसणे, २४ तास जीवन सुरक्षा रक्षक तैनात करण्याची गरज असणे, प्रसाधनगृहे, बेंचेस, कचरापेट्या आदींबरोबरच विविध सुविधांच्या निर्मिती तसेच पर्यटन विषयक तज्ञांची शासना मार्फत नियुक्ती करुन पर्यटन विकासाचा कृतिआराखडा तयार करुन त्या आराखड्याची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (६०) | ५८७३ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात मौजे रायपूर या ठिकाणी रंगात किल्ला परिसरात घाट विकसीत करणे , संरक्षण भिंत , वृक्ष लागवड, पाण्याची व्यवस्था, सौर पथदिवे, बैठक व्यवस्था, पोहच मार्ग करणे इत्यादी साठी निधीची आवश्यकता असुन सदर कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६१) | ५८७६ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात मौजे खलाटी येथे प्रादेशिक पर्यटना अंतर्गत लक्ष्मी मंदिर परिसरात घाट विकसीत करणे, संरक्ष्ंण भिंत बांधणे, सभामंडप, स्वच्छतागृह व रस्त्यासाठी निधीची आवश्यकता असुन सदर कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६२) | ५८७९ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात मौजे गुड्डापुर येथे प्रादेशिक पर्यटन अंतर्गत धानम्मा देवीमंदिर परिसरात स्नानगृह व स्वच्छतागृहाचे बांधकाम करण्यासाठी निधीची आवश्यकता असुन सदर कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६३) | ५८८० | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात मौजे कोळगिरी येथील भैरवनाथ देवस्थान सुशोभिकरण, प्रादेशिक पर्यटन अंतर्गत करण्यासाठी निधीची आवश्यकता असुन सदर कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी करावयाची कार्यवाही व यावर करावयाची उपाययोजना. |
| (६४) | ५८८५ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात उमराणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा ऐतिहासिक वारसा लाभलेले वीर दौडले सात यातील प्रतापराव गुजर यांचा सिंहाचा वाटा असुन प्रतापराव गुजर यांचे स्थानक उमराणी येथे व्हावे यासाठी स्थानिक नागरिकातून होत असलेली मागणी त्यांच्या स्मारकासाठी शिल्पातून मांडणी केली जावी त्याचप्रमाणे ऐतिहासिक संग्रहालय सुरु करणेसाठी निधी उपलब्ध करण्यासाठी करावयाची कार्यवाही व यावर करावयाची उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २१ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई